24-03-2025-Dai-03_DH_PAN_20_08_2016-3.qxp 23-03-2025 23:32 Page 1



# खासगी बस मालक आंदोलन तीव्र करणार

**२६ रोजी धरणे : खासगी बस व्यवसाय संपवण्याचा सरकारचा डाव असल्याचा राज्य बस मालक संघटनेचा आरोप**

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**पणजी, दि. २४** : थकीत इंधन अनुदान परत मिळावे आणि घोषीत केलेला विमा लाभ मिळावा या मागण्यांसाठी राज्यातल्या खासगी बस मालकांनी सरकारविरोधात आंदोलन तीव्र करण्याचा इशारा दिलाय. या लढ्याचा भाग म्हणून येत्या २६ मार्चला अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी जुंता हाऊस इथे राज्यातले सर्व खासगी बस मालक एकत्र येऊन एक दिवसाचे धरणे आंदोलन छेडणार आहेत. सरकारने जर बस मालकांच्या मागण्यांचा सहानुभुतीपूर्वक विचार करून येत्या अर्थसंकल्पात त्याविषयी काही तरतूद केली नाही तर आंदोलनाची पुढील दिशा या एक दिवसीय धरणे आंदोलनात ठरवली जाईल असा इशारा यावेळी ऑल गोवा खासगी बस मालक संघटनेचे जनरल सेक्रेटरी सुदीप ताम्हणकर यांनी दिला आहे.



यावेळी खासगी बस मालकांच्या वतीने बोलताना ताम्हणकर म्हणाले की, सरकारने मंजूर केलेले इंधन अनुदान २०१८ पासून दिलेले नाही. प्रति किलोमीटर ३ रुपये प्रमाणे असणारे हे अनुदान २०१८ ते २०20 या दोनच वर्षांपुरते दया अशी बस मालकांची मागणी आहे. तसेच विमा अनुदान जे २०१७ साली बंद करण्यात आले ते देखील द्यावे, अशीही बसमालकांची मागणी आहे. नवीन बस खरेदी करताना या विमा अनुदानातून बस मालकांना अडीच ते तीन लाख रुपये अनुदान देण्याची योजना सरकारने मंजूर केली होती. मात्र ती बंद करण्यात आली. सरकारने जी आता नवी स्क्रॅप पॉलिसी आणली आहे, त्या निकषांनुसार दीड हजारासाठी आम्हाला ३५ लाखाची नवी बस खरेदी करणे भाग पडते, जे अतिशय अन्यायकारक आहे असे ताम्हणकर म्हणाले. बस मालकांचे असेही म्हणणे आहे की, सात वर्षांचा जो रोड टॅक्स आणि प्रवासी कर आहे, त्यात सवलत द्यावी, रोड टॅक्स ३५ हजार रुपये आहे. तर प्रवासी कराची सात वर्षांची रकम सुमारे एक लाख २० हजारांपर्यंत जाते. यातून आम्हाला सवलत मिळाली तर आमचे बरचसे प्रश्न सुटतील आणि आम्ही जगू शकू. मात्र १३ तारीखला झालेल्या बैठकीत मुख्यमंत्र्यांनी अमच्या मागण्या धुडकावून लावल्या, असे ताम्हणकर यावेळी म्हणाले.

सरकार खासगी बस मालकांना माझी बस योजनेत समाविष्ट व्हायला सांगत आहे. मात्र माझी बस योजना सुरू ठेवण्यासाठी सरकारला बस मालकांना प्रति किलोमीटर ८ ते १० रुपये अनुदान द्यावे लागते. माझी बस योजनेत राज्यातले केवळ ५७ बस मालक सहभागी आहेत. राज्यभरात १४६० खासगी बसेस आहेत. मात्र सरकारने सर्व बसमालकांना या योजनेत सहभागी करून घेण्याचा काहीच प्रयत्न केला नाही. सरकारकडे माझी बस योजनेचे अनुदान द्यायला प्रती किलोमीटर ८ ते १० रुपये आहेत , मात्र आमच्या इंधन सबासीडीच्या थकीत रकमेचे तीन रुपये प्रतिकिलोममीटर देण्यास सरकार तयार नाही . केवळ एका आमदाराच्या फायदयासाठी माझी बस योजना सुरू ठेवण्यात आली, असून या सरकारला अनेक वर्षांपासून सुरू असलेला हा स्थानिकांचा व्यवसाय संपवायचा आहे, असा आरोपही यावेळी ताम्हणकर यांनी केला .

यावेळी बोलताना संघटनेचे आणखी एक पदाधिकारी सुदेश कळंगूटकर यांनी भाजपा सरकारवर सडकून टीका केली. कळंगूटकर यांनी सांगितले की, २०२२ साली निवडणुकीच्या वेळेला भाजपचे तत्कालीन प्रदेशाध्यक्ष सदानंद शेट तानावडे यांच्या सांगण्यावरून राज्यातल्या सर्व खासगी बस मालकांनी भाजपाला पाठिंबा जाहीर केला. सरकार स्थापन झाल्यावर बस मालकांचे सर्व प्रलंबीत प्रश्न मार्गी लावू असे आश्वासन त्यावेळी तत्कालीन प्रदेशाध्यक्षांनी दिले होते. मात्र सरकार येऊन तीन वर्षे झाली तरी बस मालकांचा एकही प्रश्न या सरकारने सोडवला नाही. त्यामुळे आज अनेक बस मालक कर्जाच्या खाईत बुडाले आहेत. अनेकांनी आपल्या घरातले सर्व सोने नाणे गहाण ठेवले आहे. या समस्येवर लवकर तोडगा निघाला नाही तर बस मालकांवर आणि त्यांच्या कुटुंबियांवर उपासमारीची वेळ येऊ शकते याबाबत सरकारने गांभीर्याने विचार करावा असे मत कळंगूटकर यांनी व्यक्त केले.

## निवडक



## हरमल किनारीभागात व्यावसायिकांचा धिंगाणा; कारवाईची मागणी

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**हरमल, दि. २३** : येथील किनारी भागात परप्रांतीय व्यावसायिकांच्या अतिक्रमणाने पर्यटक हवालदिल झाले असून, अलीकडे लमाणी विक्रेत्या महिला, मसाज वाले तसेच लहान मुले खाण्याची पॅकेट्स विक्री करून हैराण करीत असल्याने पर्यटकांत संताप व्यक्त होत आहे.

पर्यटन हंगामाच्या सुरवातीलाच पर्यटन खात्याकडून अनेकविध नियम व अटीचे धोरण राबवले जाते.त्यासाठी पर्यटकांच्या सुरक्षिततेसाठी किनारी विभागाचे पोलिस तसेच स्थानकाचे पोलीस ड्युटीवर असतील,असे सांगितले जाते.प्रत्यक्षात ड्युटी बजावण्यासाठी कोणता नियम आड येतो,ह्याचे उत्तर पोलिस अधिकाऱ्यांनी दिले पाहिजे.

हरमल किनारीभागात अमर बांदेकर खून प्रकरण ताजे आहे.पाण्यापर्यंत अतिक्रमण केल्याने बीचाऱ्यास जीव गमवावा लागला.परंतु पोलीस अधिकारी ड्युटीवर असते, तर तसेच पर्यटन खात्याने अतिक्रमणास हस्तक्षेप करून रोखले असते,तर सगळे सुरळीत झाले असते. परंतु एवढ्यावरच थांबणारे नसून, लमाणी लोकांचा उच्छाद पर्यटनाच्या जीवावर उठू शकतो. याचा थांगपत्ता त्या लोकांना नसेल, मात्र स्थानिक किनाऱ्याचे नाव बदनाम होत असते, असे मत व्यावसायिक हनुमंत नाईक यांनी व्यक्त केले.

पर्यटकांच्या गाड्या तसेच पर्यटकांना घेराव घालून त्यांचा पिच्छा करून हैराण केले जाते.त्यात अनेकदा लमाणी महिला अद्वातद्वा बोलत असल्याची माहिती आहे.त्यामुळे अधूनमधून बाचबाची होत असते.त्याचे पर्यवसान अनुचित प्रकारात होऊ नये,असे नाईक यानी व्यक्त केले.पोलिसांची ड्युटी कधी असते,हा प्रश्न असून, पोलिसांच्या समक्ष महिला व लहान मुले बिनदिक्कत विक्री करतात,व ह्या व्यवहारात गोलमाल असल्याचे दिसून येते.

दरम्यान, आठ दहा वर्षापूर्वी पंचायत समितीचे पंच व नागरिक, पोलिसांना घेऊन धडक कारवाई करायचे.त्यामुळे भुरट्या चोऱ्या व अतिक्रमणे तसेच लमाणी लोक किनाऱ्यावर शून्य प्रमाणात होते.मात्र किनाऱ्यावरील व्यवहारास पंचायतीस अधिकार आहेत का,असा प्रश्न असल्याने कदाचित कारवाई होत नसावी असे बोलले जाते. तरी किनारी भागाचे वैविध्यता टिकवून ठेवण्यासाठी किनाऱ्यावर केवळ पर्यटक असतील व त्यासाठी वातावरण निखळ राखण्यासाठी पोलिसांनी कारवाई करण्याची मागणी होत आहे.

---



साळ : येथील धुळवटीत सहभागी झालेले युवक.

## साळ येथे पारंपरिक धुळवट उत्साहात साजरी

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**साळ, दि. २३** : येथील पारंपरिक धुळवट उत्साहात साजरी करण्यात आली. गड्यांचे रोमाट संपल्यानंतर ढोल, ताशा हातात घेऊन महाजन तथा ग्रामस्थ तरुण व मुले मुख्य होळी कडून एकमेकांना विविध रंग फासून वरचा वाडा येथील श्री सिद्धेश्वर देवस्थान च्या प्रांगणात उभी केलेल्या होळीपाशी येऊन वंदन करून होळीला वरच्या बाजूने बांधलेला नारळ होळीवर चढून काढला तदनंतर वाढवला नि खाल्ला. रोमटात सामिल झालेले रंगाची उधळण करीत ढोल ताशा च्या नादात नाचत मिरवत गडे उत्सवाच्या ठिकाणच्या मुख्य होळी पाशी आले. धुळवटीत सामील झालेले श्री महादेव मंदिराच्या प्रांगणातील होळीपाशी आल्यानंतर श्री महादेव, श्री चव्हाटेश्वर, श्री कुळकार, श्री भूमिका, श्री रवळनाथ, श्री वेताळ व शेवटी होळी शेजारी घुमट, समेळ, कासाळेवर आरती सादर केल्या. पुरोहित सदाशिव गाडगीळ यांच्याकरवी होळीपाशी सामुदायिक गाऱ्हाणे घातल्यानंतर देवस्थान समितीचे अध्यक्ष कालिदास राऊत यांनी व नंतर उपस्थितांनी होळीला धुळ व रंग फासून पंकज केशव परब याने मुख्य होळीला बांधलेला व विराज फटी राऊत या छोट्याने राखण्याच्या होळीला बांधलेला नारळवर चढून काढला व वाढवून सर्वांनीप्रसाद म्हणून खाल्ला व नंतर राखण्याच्या होळीला बांधलेला नारळ काढून वाढविल्या नंतर ढोल ताशे वाजवत धुळवटीत सामील झालेले लहान-मोठे सर्वजण चोर रे मोर म्हणत दुपारी अडीच वाजता नदीपात्रात आंघोळ करायला देवन्यार येथे गेले व तेथे नारळ बागायतीतील माडावरील नारळ व शहाळे काढून तेथे गाऱ्हाणे घातले नि काढलेले नारळ खाल्ले. नदीत मनसोक्त आंघोळ करून नदीकाठी आल्यानंतर राहिलेली शहाळी (कोवळे नारळ) खाल्यानंतर गाऱ्हाणे घालून नदीतील कुर्ली, आता बॉब उरली, असे सामुदायिक म्हटल्यानंतर आप आपल्या घरी निघाले. अशा तऱ्हेने साळची धुळवड उत्साहात साजरी झाली. धुळवटीत प्रमुख्याने छोटी मुले आणि युवा, देवस्थान मंडळाचे सदस्य सामील झाले होते एकंदर धुळवट उत्साहात व यथासांग साजरी झाली, असे साळ देवस्थानचे अध्यक्ष कालिदास राऊत व सचिव विशाल परब यांनी सांगितले.

---



मांद्रे : शिमगोत्सवाच्या बैठकीत बोलताना आमदार जीत आरोलकर. सोबत इतर.

## मांद्रेत २७ पासून शिगमोत्सव

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**हरमल, दि. २३** : गोवा पर्यटन खाते व मांद्रे येथील उदरगत संस्थेच्या संयुक्त विद्यमाने शिमगोत्सव उत्सव गुरुवार दि. २७ ते शनिवार दि. २९ रोजीपर्यंत मांद्रे पंचायत परिसरात होणार आहे. यासाठी पूर्व तयारी बैठक आयोजित केली होती. त्याचे अध्यक्षास्थान मांद्रे मतदारसंघाचे आमदार जीत आरोलकर यांनी मार्गदर्शन केले. यावेळी शिमगोत्सव आयोजनासाठी विविध स्पर्धा आयोजनासाठी विविध समितीची निवड करण्यात आली.ह्या वेळी मांद्रे सरपंच राजेश मांद्रेकर, रॉबर्ट फर्नांडिस, सुभाष असोलकर, प्रसनकुमार शेटगावकर, हरमल सरपंच अनुपमा मयेकर, पंच भिकाजी नाईक, दयानंद मांद्रेकर आदी उपस्थित होते. स्वागत व निवेदन सूरज नाईक यांनी केले.। दरम्यान, यंदाच्या शिगमोत्सव उत्सवात आकर्षक तसेच गोव्यातील अन्यपेक्षा मांद्रेत सर्वाधिक रक्कमेची बक्षिसे देण्याचे ठरले, असे आमदार जीत आरोलकर यांनी सांगितले.

# मडगाव पोलिसांची बेकायदेशीर स्क्रॅपयार्डवर कारवाई

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**मडगाव, दि. २३** : मडगाव शहर पोलिसांनी खारेबांध येथील मनोहर पर्रिकर इनडोअर स्टेडियमजवळील बेकायदेशीर स्क्रॅपयार्डवर धाड टाकत कारवाई केली आहे. पोलिसांच्या अधिकृत निवेदनानुसार, पोलीस उपनिरीक्षक (पीएसआय) नीलेश शिरवाईकर यांच्या नेतृत्वाखाली ही कारवाई करण्यात आली. याप्रकरणी शांतीनगर, मडगाव येथील रहिवासी देवप्पा लमाणी यांच्याविरुद्ध अनधिकृत भंगार साठवणुकीप्रकरणी तक्रार दाखल करण्यात आली आहे.

स्थानिक नागरिकांनी वेळोवेळी या स्क्रॅपयार्डविरुद्ध तक्रारी केल्या होत्या. संध्याकाळच्या वेळी येथे भंगार साहित्य जाळले जात



असल्याचे निदर्शनास आले होते. परिणामी, निर्माण होणाऱ्या विषारी धुरामुळे पर्यावरण आणि सार्वजनिक आरोग्य धोक्यात येत होते. विशेषतः स्टेडियममधील खेळाडू आणि परिसरातील रहिवाशांना याचा त्रास सहन करावा लागत होता.

पोलिसांनी नागरिकांना अशा प्रकारच्या बेकायदेशीर स्क्रॅपयार्डविरोधात तत्काळ तक्रार करण्याचे आवाहन केले आहे. तसेच, स्क्रॅप डीलर्स आणि व्यवसाय धारकांनी पर्यावरणीय नियमांचे काटेकोर पालन करावे, अन्यथा कठोर कारवाई केली जाईल, असा इशारा देण्यात आला आहे.स्क्रॅप जाळल्याने हवेत हानिकारक विषारी पदार्थ मिसळत असून, हवेच्या गुणवत्तेवर गंभीर परिणाम होत आहे. विषारी धुरामुळे श्वसनासंबंधी विकार आणि अन्य आरोग्य समस्या विशेषतः परिसरातील रहिवासी आणि खेळाडू यांच्यासाठी वाढण्याची शक्यता आहे, स्टेडियम आणि रहिवासी भागाच्या जवळच हे स्क्रॅपयार्ड असल्याने आगीचा धोका आणि वेक्टर-जनित रोगांचा प्रसार होण्याची शक्यता आहे.

पोलिसांनी स्पष्ट केले आहे की, महानगरपालिका आणि अन्य संबंधित यंत्रणांसह संयुक्त निरीक्षण सुरू ठेवले जाईल. भविष्यात अशा प्रकारच्या अनधिकृत कारवायांना आळा घालण्यासाठी कडक उपाययोजना राबवण्यात येणार आहेत. सुरक्षित आणि स्वच्छ पर्यावरण राखण्यासाठी नागरिकांच्या सहकार्याची आवश्यकता असल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे. पुढील तपास सुरू असून, दोषींविरुद्ध कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल.

# आगोंद येथील बाधीत पर्यटन व्यावसायिक नोंदवणार निषेध

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**मडगाव, दि. २३** : उच्च न्यायालयाच्या आदेशांचे पालन करत, प्रशासनाने आगोंद येथे अनधिकृत पर्यटन व्यवसाय सील करण्याची मोहीम हाती घेतली आहे. गुरुवार आणि शुक्रवारी झालेल्या कारवाईत ६७ पैकी ५४ बांधकामांवर कारवाई करण्यात आली असून उर्वरित १३ व्यवसाय येत्या आठवड्यात सील केले जाणार आहेत.

शनिवार आणि रविवार अधिकृत सुट्ट्या असल्याने कारवाई तात्पुरती थांबवण्यात आली होती. मात्र, या कारवाईच्या विरोधात स्थानिक पर्यटन व्यावसायिकांनी आवाज उठवला असून एकजूट दाखवण्यासाठी ग्रामस्थांसह सोमवारी मूक मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे.

हा निषेध मोर्चा काणकोण केटीसी बस स्थानकावर सकाळी १० वाजता सुरू होणार असून, सहभागी नागरिक काणकोण उपजिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर करणार आहेत. हा सरकार किंवा सरकारी यंत्रणांविरुद्धचा विरोध नाही. आमचा संघर्ष अशा लोकांविरुद्ध आहे ज्यांच्या चुकीच्या कृत्यांमुळे स्थानिकांच्या व्यवसायांवर गदा आली आहे, असे निषेधाच्या आयोजकांनी स्पष्ट केले.

स्थानिक नागरिकांना मोठ्या संख्येने मोर्चात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. आपण एकत्र येऊन आवाज उठवला पाहिजे. आमच्या समस्या दुर्लक्षित होऊ नयेत, असे आयोजकांनी सांगितले.

दरम्यान, यापूर्वी काणकोणचे आमदार आणि सभापती रमेश तवडकर, भाजप काणकोण मंडळाचे अध्यक्ष प्रभाकर गावकर, कुशवंत भगत, स्टीव्ही रॉजियस, गौरव भगत आणि इतर प्रतिनिधींनी मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांची भेट घेऊन आगोंद येथील शॅक्स आणि अन्य आस्थापनांच्या सीलिंगसंदर्भात स्थानिकांना दिलासा देण्याची मागणी केली होती.

# शांतादुर्गा मंदिराला भेट देणाऱ्या पर्यटकांची प्रचंड गैरसोय

**४ हजार चौरस मीटरच्या कवळे पर्यटन संकुलाची अक्षम्य हेळसांड**

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**फोंडा, दि. २३** : गोव्यातील नामांकित शांतादुर्गा मंदिराला भेट देणाऱ्या हजारो यात्रेकरूंना पार्किंग सुविधांच्या अभावामुळे मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. १९९६ मध्ये बांधलेले ४ हजार चौरस मीटरचे कवळे पर्यटन संकुल, जे पर्यटकांसाठी निवास व सुविधांसाठी विकसित करण्यात आले होते, सध्या अत्यंत दुर्लक्षित अवस्थेत आहे.

सदर संकुलामध्ये हॉटेल, वसतिगृहे आणि शौचालये यांचा समावेश होता, मात्र गेल्या काही वर्षांपासून हे संकुल ओसाड असून, ते जीर्णावस्थेत गेले आहे. संकुलातील रेस्टॉरंट मागील दशकभरापासून बंद असून, वसतिगृहे केवळ तीन वर्षेच कार्यरत राहिली. आता हा संपूर्ण परिसर झुडुपांनी व्यापला असून, रचना ओळखणेही कठीण झाले आहे.

शांतादुर्गा मंदिर हे देशातील प्रमुख तीर्थक्षेत्रांपैकी एक असूनही, पर्यटन विभागाने या परिसराच्या पायाभूत सुविधांकडे गेल्या दोन दशकांहून अधिक काळ दुर्लक्ष केले आहे.



दरम्यान, कवळे पंचायतीने पर्यटन विभागाला हा ओसाड प्रकल्प स्थानिक विकासासाठी हस्तांतरित करण्याची मागणी वारंवार केली आहे. पर्यटकांसाठी या जागेचा पार्किंग क्षेत्र म्हणून पुनर्विकास करावा, अशी मागणीही पंचायतीने केली आहे. मात्र, अद्याप अधिकाऱ्यांकडून कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही.

जुन्या पर्यटन संकुलासमोरील एकमेव मोकळी जागा सध्या डंपिंग साईटमध्ये रूपांतरित झाली आहे. बांधकामाचे ढिगारे आणि चिखल साचल्यामुळे ही जागा वापरण्यायोग्य राहिलेली नाही. याशिवाय, ढवळी ते फर्मागुडी महामार्गाशी जोडणारा कवळे बायपास रस्ताही कचऱ्याच्या ढिगाऱ्यांमुळे अडथळलेला आहे.

स्थानिक नागरिकांनी प्रशासनाला वारंवार मागणी करूनही कोणतीही सुधारणा करण्यात आलेली नाही. रहिवाशांचे म्हणणे आहे की, दुर्दशाग्रस्त संकुल पाडून त्या जागी पार्किंगची सुविधा विकसित करावी, ज्यामुळे यात्रेकरूंना अधिक सोईस्कर वाहतूक व्यवस्था उपलब्ध होईल.

शांतादुर्गा मंदिर परिसरात दिवसेंदिवस वाढणाऱ्या गर्दीमुळे सुव्यवस्थित पार्किंग व्यवस्था आवश्यक आहे. स्थानिक प्रशासन आणि पर्यटन विभागाने याबाबत त्वरित निर्णय घेऊन योग्य पावले उचलावीत, अशी मागणी स्थानिक नागरिक करत आहेत. अन्यथा, येथील वाहतूक समस्या अधिकच चिघळण्याची शक्यता आहे.

# डिचोलीतील सार्वजनिक उद्याने अत्यंत दुरवस्थेत!

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**डिचोली, दि. २३** : डिचोली शहराच्या मध्यवर्ती भागातील आणि नगरपरिषदेच्या समोर असलेले उद्यान अत्यंत दुरवस्थेत सापडले आहे. खेळण्याचे साहित्य जुने आणि निकृष्ट स्थितीत असल्याने मुलांसाठी हे उद्यान असुरक्षित ठरत आहे. पालकांना आपल्या मुलांना सतत नजर ठेवावी लागत आहे, कारण उद्यानातील झोके आणि इतर खेळणी तुटलेल्या अवस्थेत आहेत.विशेषतः , झुल्याचा एक संच गेल्या दोन वर्षांपासून निकामी होता. आता गेल्या दोन महिन्यांत दुसराही तुटल्याने मुलांच्या खेळण्यावर मर्यादा आल्या आहेत. तात्पुरत्या दुरुस्तीच्या नावाखाली एका झोक्याला फक्त कापडाचा तुकडा बांधण्यात आला असून, तो ही स्थानिक मुलांनीच केला असण्याची शक्यता आहे.

उद्यानातील मल्टी-प्ले स्टेशनच्या स्लाइड्स गंजल्या आहेत, तर सुरक्षेसाठी असलेले पॅनेल बाजूला ठेवण्यात आले होते. नुकतीच त्यांची दुरुस्ती झाली असली तरी, खेळणी अद्याप पुरेशा दुरुस्त नाहीत. स्लाइड्सकडे जाणाऱ्या पायऱ्यांचे रेलिंग तुटले आहे आणि काही भाग गंजल्यामुळे खेळणाऱ्या मुलांसाठी मोठा धोका निर्माण झाला आहे. तसेच, खेळाच्या मैदानातील वाळू दीर्घकाळ स्वच्छ केली गेली नसल्याने त्यात तुटलेल्या काचेचे तुकडे आढळले आहेत. मल्टी-प्ले स्टेशनच्या रॉक क्लाइंबिंग भागात वाळू आणि कोरडी पाने साचल्याने लहान मुलांना पकड घेणे कठीण जात आहे.

शहरातील अनेक मुले शाळा किंवा शिकवणी वर्ग संपल्यानंतर सरळ उद्यानात खेळण्यासाठी येतात. पालक त्यांच्या मुलांची नेहमी देखरेख करू शकत नाहीत, त्यामुळे खेळाच्या मैदानाची सुरक्षा अत्यंत महत्त्वाची आहे. उन्हाळ्याच्या सुट्ट्या जवळ आल्याने लहान मुले अधिक वेळ खेळाच्या मैदानात घालवणार आहेत. अशा परिस्थितीत, महानगरपालिका उद्यानाच्या दुरुस्तीला प्राधान्य दिले जाणे गरजेचे आहे.

डिचोली हे वाढत्या लोकसंख्येमुळे वेगाने विस्तारत असलेले शहर असून, येथील पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा करण्यावर भर दिला जात आहे. याच पार्श्वभूमीवर, बसस्थानकाजवळील वासुदेव नगर येथे नव्याने विकसित उद्यानाचे उद्घाटन करण्यात आले. या उद्यानात मुलांसाठी नवीन झोके, घसरगिरी आणि मल्टी-प्ले स्टेशन उभारण्यात आले असून, मुलांनी याचा आनंद लुटायला सुरुवात केली आहे. पण नगरपरिषदेच्या इतर उद्यानांची अवस्था अत्यंत वाईट असल्याचे नागरिक सांगत आहेत.

नागरिकांच्या मते, प्रशासनाने त्वरित पावले उचलून उद्यानातील खेळणी दुरुस्त करावी व साफसफाई करावी, जेणेकरून मुलांना सुरक्षित वातावरणात खेळण्याचा आनंद घेता येईल. दुर्घटना घडल्यानंतर उपाययोजना करण्यापेक्षा, वेळीच लक्ष घालून उद्यान सुस्थितीत ठेवणे महत्त्वाचे असल्याचे स्थानिक रहिवासी सांगत आहेत.